# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/3883
दिनांक :- 21 SEP 2018

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित पदवी व
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
**औरंगाबाद विभाग.**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या आपले सरकार डीबीटी पोर्टल बाबतची माहिती देण्यासाठी ओरिएंटेशन/ट्रेनिंग प्रोग्रॅम (Orientation Programme of Aaple Sarkar DBT Portal for 2018-19)**

संदर्भ :- मा.सचांलक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी-पोर्टल/२०१८/३२०, दिनांक १९/०९/२०१८

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, सन २०१८-१९ करिता महाराष्ट्र राज्य शासनाच्या ३७ योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, आपले सरकार डी.बी.टी पोर्टल (संकेतस्थळ : **http://mahadbtmahait.gov.in**) बनविण्यात आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
(२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निवाळ भत्ता योजना
(३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून).

सर्व संस्थांनी त्यांना प्राप्त झालेल्या पोर्टलबाबतच्या लॉगीन क्रिडेन्शिअल्सचा वापर करुन संस्थाबाबतची अचूक माहिती (प्राचार्यांचे नांव, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांना लागू असलेले सर्व शल्क व परीक्षा शुल्क) ऑनलाईनरित्या अद्यावत करुन मंजूरीसाठी दिनांक २५/०९/२०१८ तारखेच्या आंत पाठविणे गरजेचे आहे.

तेंव्हा संस्थांचे प्राचार्य व संस्था स्तरावर योजनांचे शिष्यवृत्तीचे काम ऑनलाईन पहाणारे/ज्यांना संस्थेच्या प्रोफाईल ऑनलाईन भरण्यामध्ये अडचण आहे अशा अधिकारी/कर्मचारी यांना आपले सरकार डीबीटी पोर्टल बाबतची माहिती देण्यासाठी ओरिएंटेशन/ट्रेनिंग प्रोग्रॅम **(Orientation Programme of Aaple Sarkar DBT Portal for 2018-19)** खालील वेळापत्रका प्रमाणे व ठिकाणी आयोजित करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | ज्या संस्थांकरीता ट्रेनिंग प्रोग्रॅम आयोजित केले त्या संस्था | ट्रेनिंग प्रोग्रॅम आयोजित केले ते ठिकाण | विषय |
|---|---|---|---|---|
| ०१ | २४/०९/२०१८ | औरंगाबाद/जालना/बीड व उस्मानाबाद जिल्हयातील संस्था | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद. | ओरिएंटेशन/ट्रेनिंग प्रोग्रॅम **(Orientation Programme of Aaple Sarkar DBT Portal for 2018-19)** |
| ०२ | २५/०९/२०१८ | नांदेड/लातूर/परभणी/ हिंगोली जिल्हयातील संस्था | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड. | |

तरी प्राचार्य/ संस्था स्तरावर योजनांचे शिष्यवृत्तीचे काम ऑनलाईन पहाणारे/ज्यांना संस्थेच्या प्रोफाईल ऑनलाईन भरण्यामध्ये अडचण येत आहे अशा सर्व प्राचार्य/अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त प्रशिक्षणास उपस्थित रहावे.

श्री वाय.डब्ल्यू. रामगिरवार, प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी उपरोक्त वेळापत्रका प्रमाणे त्या-त्या ठिकाणी उपस्थित राहुन संबंधीतांना सविस्तर प्रशिक्षण देण्यांबाबतची कार्यवाही करावी. त्याबाबतचे कार्यालयीन आदेश स्वतंत्रपणे निर्गमित होतील.

**प्राचार्य**, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, **औरंगाबाद व प्राचार्य**, शासकीय तंत्रनिकेतन, **नांदेड** यांनी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे आपल्या संस्थेतील सेमिनॉर हॉल/कॉन्फारन्स हॉल प्रोजेक्टर व आवश्यक त्या संगणकासह प्रशिक्षणाकरीता उपलब्ध करुन दयावेत.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

०१. प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद.
०२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड .
०३. आस्थापना -३, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
०४. श्री वाय.डब्ल्यू. रामगिरवार, प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.